# सायक्लोथॅनला पुण्यातील रुग्णालयांचे सहकार्य

मुकुल माधव फाउंडेशनतर्फे फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सहकार्याने ८ डिसेंबर ते १२ डिसेंबर या कालावधीत पुणे ते रत्नागिरी अशी सायक्लोथॉन आयोजित करण्यात येत आहे. या माध्यमातून समाजातील दुर्बल घटकांना मदत करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी पुण्यातील विविध महत्त्वाची रुग्णालये सहकार्य करणार आहेत. या यात्रेदरम्यान शिरवळ, उंब्रज, कोकरुड आणि पाली येथील चार जिल्हापरिषद शाळांमध्ये वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. आरोग्य शिबिरांमध्ये केईम रुग्णालय, भारती रुग्णालय, एच.व्ही. देसाई नेत्र रुग्णालय या रुग्णालयांच्या विविध विभागांचे पथक असणार आहे, अशी माहिती फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाबरिया यांनी दिली.